ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# भारतीय महिलांचा सामाजिक दर्जा

प्रा. डॉ. वृशाली विलास कोल्हे
समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व गृहविज्ञान
महिला महाविद्यालय, जळगांव

**प्रस्तावना :**

भारतीय समाजातील स्त्री जीवनात आजपर्यंत काळानुरूप अनेक चढउतार आलेले पाहावयास मिळतात. प्राचीन काळात पूर्व वैदिक या कालखंडात स्त्रियांचा साामाजिक दर्जा उंचावलेला दिसून येतो. परंतु उत्तर वैदिक काळात स्त्रीयांचा दर्जा खालावला तो ब्रिटिश सत्तेच्या अस्तापर्यंत म्हणजेच ब्रिटिशांनी शिक्षणाची मुभा दिल्याने स्त्रिया मध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले व त्यामुळे काही प्रमाणात स्त्रियांचा सहभाग विविध क्षेत्रात वाढला.

निसर्ग निर्मित स्त्री–पुरूष अशा दोनच जाती भूतलावर आहेत असे अभ्यासक मानतात. जगाचा अभ्यास केल्यानंतर भारतीय समाजाची तुलना विशे ातः स्त्रीयांच्या दर्जा विषयी केली तर भारतीय महिलांचा दर्जा निम्न आहे असे म्हणावे लागते. भारतामध्ये पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटूंबात पुरूषांनाच सर्व अधिकार असतात तर स्त्री ही दुय्यम असते. स्त्रीयांचा सामाजिक दर्जा विषयी लिहीतांना शुभांगी गोरे म्हणतात ''प्राचीन काळापासून भारतीय महिलांना समाजात फक्त उपेक्षाच नाही तर उपेक्षित गुलामीची वागणूक मिळाली आहे. तीची धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये गुलामगीरी हेतू पुरस्सर केली आहे. 1)''स्त्रीयांच्या समस्या ह्या पुरूषाने निर्माण केल्या आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. धर्माचा आधार घेवून स्त्रीयांना भयभीत करून स्त्रीयांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले. मातृसत्ताक पद्धत काही काळी भारतात सुरू होती. त्यामध्ये स्त्रियांना सर्वत्र स्वातंत्र्य होते. मातृसत्ताक कालखंडात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने शिक्षण साहित्य अभ्यासण्याचे स्वातंत्र्य होते. धार्मिक कार्य तर स्त्री शिवाय केले जात नसे. त्यामुळे स्त्रियांचा कुटूंबात अधिक सन्मान होत असे. स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक आदि प्रकारचे स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या स्त्रीला पुरूषसत्ताक कुटूंबात गुलामीचे जीवन जगावे लागले. मनुस्मृती नावाच्या ग्रंथाने स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले व तीला कमालीचे दुःखद जीवन दिले. भारतीय समाजात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, उपास तापास, देव, व्रत्य–वैकल्प अशा अनिष्ठ चालीरीती समाजात घुसाडल्या गेल्या व भारतीय समाज व्यवस्था अधोगतीच्या तळाला गेली तर स्त्रियांच्या हाल अपेष्टा अधिक झाल्याचे दिसून येते.

**प्राचीनकालीन स्त्रीजीवन :** प्राचीन काळातील स्त्रीयांचे जीवन श्रेष्ठ दर्जाचे होते. सिंधू संस्कृतीत स्त्रियांना सर्वच क्षेत्रात सन्मान असलेला दिसतो. परंतु वैदिक काळात स्त्रीयांचे हक्क कमी करण्यात आले. स्त्रीयांना सामाजिक बंधने घालण्यात आली. हिंदू धर्मग्रंथ व मनुस्म ती प्रमाणे स्त्रीयांना वागविले जाई. त्यामुळे स्त्रिया ह्या गुलामीत जीवन जगत असत, बालविवाह, जरठ विवाह, केशवपण, सतिप्रथा, मुरळी, दासी इत्यादी वाईट प्रथामुळे स्त्रीजीवन नरकमय झाले होते. नको हा स्त्रीजन्म हा विचार स्त्रियांच्या मनात डोकावत असे. सामाजिक कार्यात स्त्रियांचा नगण्य सहभाग होता. कुलीन–घराण्यातील स्त्रीयांना थोडी बुडत संधी असलेली दिसून येते. कारण राज घराण्यातील सीमा ह्या शिक्षित असत. त्यामुळे त्यांना सामाजिक व धार्मिक कार्यात सहभाग घेता येत असे. परंतु या स्त्रीया अतिशय कमी दलन–तर उर्वरित बहुतांश स्त्रीयांना धाार्मिक कार्यात सहभागी होता येत नसे.

प्राचीन कालीन स्त्रीयांचे कौटूंबिक स्थान हे कनिष्ठ होते. स्त्रियांना पुरू ा निर्णय प्रक्रियेस सहभागी करून घेत नसत. राजकारणातील स्त्रियांचे स्थान गौण होते. तर आर्थिक व्यवहार पुरूषच पाहत असत. शिक्षणाचा गंध नसलेली स्त्री गुलामासारखे कामच करीत असे. विवाह प्रसंगी स्त्रियांचा विचार घेतला जात नसे. कुलीन वर्गातील स्त्रीयांना विवाह करते वेळी आपल्या पसंतीचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते. परंतु सामान्य स्त्रीयांना हा अधिकार नव्हता. बालविवाह झालेल्या मुलीला कमी वय असल्यामुळे सांसरीक जीवन जगतांना अनंत अडचणी येत असत. जरठविवाहाची प्रथा होती. अशा बालिकेला आयुश्यभर समस्या होत्या. सतीच्या प्रथेचा जन्मही प्राचीनकाळात झाला. ऐतिहासिक कागदपत्रा वरून असे दिसते की, ही प्रथा गुप्तांच्या काळात इ.स. 320 ते 550 या दरम्यान सुरू झाली. 2) प्राचीनकाळी मुलीवर सहा वर्ष देवाचा हक्क असे आणि त्यानंतर पुरूषांचा म्हणून आठव्या वर्षी मुलीचा विवाह करावा अशी सामाजिक रूढी निर्माण झाली. अतिशय कमी वयात मुलींचा विवाह झाल्याने तीच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याने परिणामी तीला मृत्यूला सामोरे जावे लागत असे. धर्मात सांगितले म्हणून बालविवाह, जरठ विवाह आदि वाईट रूढी विवाहा संदर्भात जाणवतात. मनुस्मृतीने सांगितले त्या प्रमाणे

हिंदूने वागावे असा दंडक समाजात होता. ''बारा वर्षाची मुलगी व तीस व र्षाचा मुलगा किंवा आठ व र्षाची मुलगी व चोवीस व र्षाचा मुलगा लग्नासाठी योग्य समजावा असे मनुस्मृती सांगते.''3) स्त्रीबाबत समाजात एक अशी धारणा झाली होती की, लग्नानंतर स्त्रियांवर फक्त तिच्या पतिचाच अधिकार असे. पति निधनानंतर तिचे वाकडे पाऊल पडू नये म्हणूनच सतीची प्रथा सुरू झाली, त्यामुळे तीचे स्वातंत्र्य अस्तित्वच नष्ट झाले. स्त्रियांना शिक्षण नसल्यामुळे स्वातंत्र्य विचार करणे त्यांना शक्य नव्हते. पुरूष प्रधान संस्कृतीत सर्व अधिकार पुरूषांना असतात. त्यामुळे स्त्रियांना गौण स्थान असते.

**मध्ययुगीन स्त्रीयांचा सामाजिक दर्जा**

समाजात समुहाने राहण्यासाठी सामाजिक नियंत्रण आवश्यक असते. सामाजिक ऐक्य टिकविण्यासाठी असे नियमन व नियंत्रण आवश्यक असते. त्यासाठी समाज न्यायव्यवस्था निर्माण करीत असतो. त्याप्रमाणे मध्ययुगात 'गोतसभा' नियंत्रण करीत असे. कोणी स्त्री–पुरू षांनी समाज बाह्य, धर्मबाह्य वर्तन केले तर जातपंचायत बोलावून सर्वानुमते निर्णय घेवून समाजा तर्फे आरोपीस शिक्षा केली जाते. या शिक्षेचे स्वरूप जाति बाहेर टाकणे, बहिष्कार, त्याच्या घरच्या कोणत्याही कार्यास न जावे, त्याच्या घरचे अन्न ग्रहण न करणे अशा स्वरूपाच्या भयंकर शिक्षेमुळे जातिनिर्बंध फारच कडक होते. जवळपास प्रत्येक जातीत समाज रचनेचा पाया हा असाच असे. या समाज रचनेचा पाया प्राचीन कालीन समाज व्यवस्थेतून पुढे चालत आला. यास मनुस्मृतीचा आधार आहे. तोच पाया 18 व्या शतकातही पक्का रूतलेला होता. या समाजरचनेत पुरूष प्रध ान असून स्त्रीही गौण ठरलेली आहे. यापूर्वी वेद काळात मातृसत्ताक कुटूंब पद्धती होती. पुढे विवाह संस्था अस्तित्वात आली आणि मातृसत्ताक कुटूंब पद्धती जाऊन पुरूष प्रधान संस्कृती झाली.

**सती प्रथा आणि स्त्री जीवन** : भारतीय हिंदू समाजातील अतिशय घणास्पद असणारी ही प्राचीन सती प्रथा आहे. या प्रथेमध्ये विधवा पत्नीला मृत्यु झालेल्या पतीच्या अंत्य संस्काराच्या वेळी चितेवर जिवंत जाळले जाई. किंवा पत्नी स्वतः पतीच्या चितेवर उडी घेणे व स्वतःला संपविते. विधवा पत्नीची चितेवर जाण्याची इच्छा नसली तरीही तिला चितेत टाकले जाई. कारण मनुस्मृतीत तसे लिहून ठेवले होते. त्याचप्रमाणे ती एक सामाजिक कार्य, जाण, जबाबदारी समजून सती जाण्याची प्राचीन काळातील प्रथा मध्ययुगातही अस्तित्त्वात होती. स्त्रीबाबत समाजात एक अशी धारणा झाली होती की लग्नानंतर स्त्रियांवर फक्त तिच्या पतीचाच अधिकार असे. पति निधनानंतरा तिचे वाकडे पाऊल पडू नये म्हणूनच सतीची चाल सुरू झाली आणि तिचे स्वतंत्र अस्तित्त्वाच नष्ट करून टाकण्यात आले. तत्कालीन राजकर्त्यांनीही या चालीला प्रोत्साहन देऊन त्यास अधिक बळकटी दिली. पेशव्यांच्या व राजकर्त्यांच्या अनेक स्त्रिया सती गेल्याची उदाहरणे ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येतात. बहुजन वर्गातील स्त्रिया मात्र पुनर्विवाह करून जगू शकत होत्या. मात्र अभिजन वर्गातील व कुलीन मराठा स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास सामाजिक रूढी व परंपरेनुसार बंधन घालण्यात आले होते. सती गेलेली स्त्री ही आपल्या पतीला पाप मुक्त करते आणि आपल्या आईवडिलांना शुद्ध करते. असा समज समाजात रूढ असल्यामुळे कुटूंबातीलच लोक स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडीत असत. तिच्यावर दबाव आणीत असत. पतिता व व्याभिचारी स्त्रीला समाज बहिष्कृत करीत असे. स्त्री धनाबाबतही समाजाचे नियम होते. पेशवाईत स्त्री खरेदी–विक्री करण्याची वस्तू होती. व त्यास समाज व राजमान्यता होती. 4)

**बालविवाह, जरठ विवाह व केशवपन**

प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्रथांना मनुस्मृतीचा आधार होता. तोच पाया 18 व्या शतकातही खोलवर रूजलेला दिसतो. समाज रचनेत पुरूष हा प्रधान असून स्त्री ही गौण ठरलेली दिसून येते. या पुर्वीच्या वेद काळात मातृसत्ताक कुटूंब पद्धती जाऊन पुरू षप्रधान संस्कृती आली. या प्रकारच्या विवाह संस्थेचा संस्थापक वेतकेतू मानल्या जातो. बालविवाह, बालजरठ विवाह सती प्रथा या समाजमान्य रूढी होत्या विध ावा विवाह उच्च वर्णीय समाजात नि षिद्ध मानला जात असे. लहान वयातच विधवा झालेल्या मुलींना आयुष्यभर उपेक्षित जीवन जगावे लागत असे. केश वपन करणे, खाण्याच्या बाबती तही निकृष्ट अन्न खाणे, आयुष्यभर अंधार कोठडीत खितपत पडावे लागत होते. कोणत्याही शुभ कार्यात त्यांना प्रवेश नव्हता मुळातच जन्माला येणे क्लेशदायक मानले जाई. या काळातील विवाह पद्धत ही स्त्रियांवर अन्याय करणारीच होती. मुलींचे लग्न आठ वर्षा पर्यंत केले तर ते समाज मान्य होते. जश्रतु येण्याच्या आत मुलीचे लग्न झाले पाहिजे असा समाजाचा दंडक होता.

**जरठ विवाह** : या प्रकारात कमी वयाची मुलगी व जास्त वयाचा पुरूष म्हणजेच आठ ते दहा वर्षांची मुलगी व सत्तर वर्षांचा पुरूष अशी अनेक उदाहरणे इतिहासात पाहायला मिळतात. मध्ययुगात विद्वान लोकांनी जरठ विवाह केले असल्याची नोंद आहे.

**केशवपन** : पतीच्या निधनानंतर पत्नीने आपले मुंडण करून पांढरे वस्त्र धारण करून आयुष्यभर विधवेचे जीवन जगावे असा नियम होता. मंगळसुत्र, पंच, पातळ, खण इत्यादी वस्तूचे ब्राह्मणा सदान विधिवत दान करावे लागत असे.

**पडदा पद्धत** : पर पुरूषांची नजर पडू नये म्हणून मुस्लीम स्त्रीया पडदा लावत असत. तीच पद्धती भारतात मुस्लिम आगमनानंतर हिंदूनीही स्वीकारली. मध्ययुगात राजपूत स्त्रिया, कुलीन मराठा स्त्रिया या पडदा पद्धतीचा अवलंब करीत असत.

**दास पद्धती** : पुरूषांना दास म्हणून अनेक राज घराण्यात ठेवत. त्याच प्रमाणे स्त्रियांनाही ठेवण्यात येत असे. याला पेशवाई अपवाद नव्हती. गुलामाचा व्यापार करणे, स्त्रियांची खरेदी–विक्री करणे हे राजमान्य होते. म्हणून अनेक स्त्रिया ह्या दासी बनल्या होत्या.

**देवदासी / मुरळी** : देवदासी किंवा मुरळी ह्या प्रथेमध्ये मुलगी जन्माला आल्यानंतर तिला देवाला देणे म्हणजेच देवाला अर्पण करणे. तिचा सांभाळ मंदिराच्या पुजाऱ्याने किंवा संबंधित व्यवस्थेने करावयाचा असा सामाजिक संकेत होता. देवदासी किंवा मुरळी झालेल्या मुलींचा सांभाळ करणारे विश्वस्त तीला सांगतील ती कामे करावी लागत असत. वाघ्या मुरळी अशी परंपरा आपल्या महाराष्ट्रात पाहावयास मिळते. ते नाचगाणे करून आपला उदरनिर्वाह करतात. देवदासींना त्यांच्या जीवनामध्ये अनंत समस्यांना सामोरे जावे लागत असे.

**आधुनिक काळातील स्त्रीजीवन** : ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थिरावल्यानंतर भारतात एका वेगळ्या राजकीय जीवनाला भारतीय समाज सामोरे जातांना दिसतो. अनेक जाती त्यांच्या व्यवस्था, रूढी, परंपरा, चालीरीती, संस्कृती, धार्मिक, विविधता अशा भूप्रदेशात ब्रिटिश राज्य करीत होते. त्यांची शासन अंमल करण्याची आधुनिक पद्धती आणि वेगळे बदल म्हणून त्यांच्या कालखंडाला आपण आधुनिक कालखंडाची सुरूवात असे म्हणू शकतो.

**सामाजिक जीवन** : स्त्रीयांच्या सामाजिक जीवनात म्हणावा तेवढा बदल पाहावयास मिळाला नाही. ब्रिटिशांच्या आगमनाने बऱ्याच सुधारणाला सुरूवात झाली होती. जसे सतिची चाल बंद करण्यात आली, बालविवाह रोकण्यात आले, स्त्रीयांना शिक्षणचा हक्क मिळू लागला. त्यामुळे समाजात काही प्रमाणात स्त्रीयांना सकारात्मक जीवन अनुभवास मिळाले हे खरे असले तरी प्रत्येक कुटूंबात स्त्रीयांच्या बाबतीत सारखीच स्थीती असते असे नाही. ब्रिटिशांनी सतीची चाल बंद करून कायदा केला पण तो हिंदू धर्मियांना मान्य नव्हता. समाजात कर्मठ लोक लपून चोरून आपल्या अनिष्ठ चाली पाळत असत. दिवास्तविकता आहे. बालविवाह सर्रास होतांना आजही पाहावयास मिळतात. विवाह करते वेळी स्त्रियांना विचारात घेतले जात नाही ही आजही ग्रामीण भागातील स्थीती आहे. कारण भारतात पुरुष प्रधान संस्कृती आहे.

**धार्मिक जीवन** : धार्मिक, सण, उत्सव, पुजा–पाठ इत्यादीमध्ये स्त्रियांचा सहभाग पुरूषांच्या बरोबरीने असतो. परंतु प्रथम अधिकार पुरूषांचा असतो. म्हणजे स्त्रियांना कनिष्ठ स्थान असते. पुरूष धार्मिक जीवन बिनधास्त जगू शकतो परंतु स्त्रियांना तसे करता येत नाही. पतिची सेवा करणे, तो कसेही वर्तन करणारा असला तरी 'पती परमेश्वर' समजून स्त्रियांनी आपल्या नशिबाचा भाग समजावा अशी धार्मिक रीत आहे.

**राजकीय जीवन** : ब्रिटिश काळात स्त्रियांना राजकीय जीवनात बरेच स्वातंत्र्य मिळत गेले. किंबहूना काही महिलांनी सहभाग नोंदविला. प्राचीन काळात, मध्ययुगात–राजघराण्यातील स्त्रीया राजकारणात काही प्रमाणात होत्या, परंतु आधुनिक काळात सर्वसामान्य स्त्रिाया राजकारणात येवू शकत होत्या. आधुनिक काळातील महिला बऱ्याच प्रमाणात आत्म निर्भरतेकडे वाटचाल करतांना दिसतात. कारण शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली आहेत. त्यामुळे महिलांना शिक्षण झाल्यानंतर, व्यवसाय, नौकरी किंवा शेती करतांना येणारे उत्पन्न हे त्यांच्या मालकिचे असल्याचे आर्थिक दर्जा बऱ्याच महिलांचा उचांवलेला आहे.

**आजची स्त्री व सामाजिक दर्जा** : आधुनिक काळातील स्त्री म्हणजेच आजची स्त्री स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रीयांच्या जीवनात बरेच बदल झाले. कारण स्वातंत्र्य समता, न्याय, बंधुत्त्व या आधारावर लोकशाही निर्माण झाली. स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क प्राप्त झाले. ब्रिटिश काळातील मर्यादित संधी अमर्यादीत बनल्या त्यामुळे स्त्रीयांचे जीवन स्वातंत्र्य बनले आहे. परंतु भारतात प्राचीन काळापासून स्त्रियांना हिन लेखण्याची जी पद्धती आहे तीचा बदल होणे अपेक्षित आहे. आणि याच प्रयोजनार्थ ही ोध पत्रिका आहे. कारण स्त्रियांच्या समस्या बदलल्या म्हणजे त्या कमी झाल्या असे नव्हे. सतिची चाल बंद झाली म्हणजेच समस्या कमी झाल्या नाहीत. कारण पुरूष प्रधान संस्कृतीची मानसिकता तसी आहे आजची स्त्री निर्भिड, सजग, बलशाली इत्यादी विशेषणे लावून पुरू ा मोकळे होतात. पण खरच हे सत्य आहे काय? असा प्रश्न पडतो तर हे असत्य आहे हि वास्तविकता आहे. स्त्रियांना शिक्षणाची समान संधी मिळाली हे खरे आहे परंतु ग्रामीण भागातील शिक्षण घेतलेल्या किती स्त्रिया स्वतःचा व्यवसाय करतात. नौकरी

करतात, हे पाहणे आगत्याचे आहे. आर्थिक स्थिती चांगली नसल्याकारणाने मुली शिक्षण घेत नाहीत तर त्यांचा विवाह केल्या जातो. कारण ती एक जबाबदारी म्हणून पालक पार पाडतात. एकूणच महिलांचा सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय दर्जा पाहत असतांना स्त्रियांचे कौटूंबिक स्थान पाहणेही महत्त्वाचे ठरते. 8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. त्यावर गोसावी मजुंषा यांनी भा य करतांना म्हटले आहे. ''8 मार्च हा आंतर राष्ट्रीय महिला दिन म्हणून यूनोने जाहिर केला तेंव्हा पासून आजपर्यंत भारतात स्त्रीवादी चळवळींवर अनेक भाषणे दरवर्षी संपन्न होतात. परंतु स्त्रियांचा दर्जा व स्त्रियांवरील हिंसाचार कमी न होता वाढतच आहे.'5 प्राचीन काळापासून महिलांवर अन्याय, अत्याचार होतांना आपल्याला दिसतात. कायदे, नियम सर्व निर्माण झाले. परंतु कुटूंबात राहत असतांना तिला समाजाचे व कुटूंबाचे नियम पाळावे लागतात. त्यामुळे तिच्यावर अन्याय होतांना दिसतो.

**आजची स्त्री व कौटूंबिक जीवन** : महिलांनी कितीही शिक्षण घेतले, पैसे कमविले तरी तीला घरातील नियम पाळावेच लागतात. उदा. स्वयंपाक महिलांनीच करावा, सर्वाची सेवा करावी, इतकेच नाही तर शिळे अन्न वाया घालू नये तर ते महिलांनीच खावे. तीला वस्तू घ्यावयाची असेल तर पुरूषांच्या परवानगी शिवाय घेता येत नाही. तीच्या ईच्छा तीला घरात बोलून दाखविता येत नाही. सामाजिक कार्यात, धार्मिक कार्यात जातांना परवानगी शिवाय जाता येत नाही'.

**कौटूंबिक हिंसाचार** : भारतीय समाजात स्त्रियांचे कौटूंबिक स्थान हे दुय्यम आहे. हि वस्तूस्थिती आहे आणि ग्रामीण भागात तर आहे. मानसिक त्रास देणे, लग्नातील राहिलेला हुंडा आण म्हणून सतत तगादा लावणे. शिवीगाळ करणे, मारहाण करणे, निकृष्ठ जेवन इत्यादी स्त्रीयांना आज समस्या आहेत. हुंड्यासाठी स्त्रीयांचा बळी जातो आहे. तीला आत्महत्या करावयास भाग पाडले जाते ही समाजातील भीषण वास्तव्य आहे

**विधवा/परितक्तत्या स्त्रियांचे सामाजिक जीवन** :ग्रामीण भागात पति निधनानंतर अनेक स्त्रिया विधवा झाल्या नंतर जीवन व्यतित करतांना पाहावयास मिळतात. परंतु विधवा स्त्रियांना समस्यांना सामोरे जावे लागते. लोकांची वाईट नजर, समाजाची नियम, बंधने पाळावी लागतात. तर परितक्तत्या स्त्रिया ंनाही अनेक समस्या असतात. कारण नवऱ्याला सोडून राहत असतात.

**नौकरी, व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या** : नौकरी करणाऱ्या स्त्रियांना एक स्त्री म्हणून कार्यालयात, बाहेर प्रवास करतांना अनेक समस्या येतात कार्यालयात मुद्दाम महिलांना कामे सांगितले जातात. व्यवसाय करणाऱ्या महिलांना पुरू ांचे सहकार्य ईच्छा नसते. तर काही ठिकाणी पुरूषांच्या ईच्छेला स्त्रियांना बळी पडावे लागते. ही मानसिकता भारतीय समाजातील पुरुषांची आहे.

**बलात्कार** : बलात्कार हि सामाजिक समस्या आहे. भारतात बलात्काराचे प्रमाण वाढतच आहे असे युनोच्या अहवालात म्हटले आहे. प्रेमभंग, एकटी स्त्री, प्रवास दरम्यान, शेती–वस्तीवर एकटी स्त्री, कुटूंबातील कलह, किंवा कुटूंबातील विधवा स्त्रीयांवर अत्याचार आदी प्रकारचे अत्याचार स्त्रियांवर होतांना दिसतात. बलात्काराच्या घटना वृत्तापत्रातूना आपण नेहमीच वाचतो. त्यामुळे हे अंगळवणी पडले असेच वाटते. परंतु कधी–कधी जनतेचा प्रकोपही होतांना दिसतो. परंतु समाजाची स्त्रियांना पाहावयाची कोणती दृष्टी आहे हेच यावरून सिद्ध होते. म्हणजेचा पुरूषांच्या नजरेत स्त्रिया दुय्यम आहेत. असेच म्हणावे लागेल. त्यामुळे प्रस्तुत ठिकाणी स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा निन्म आहे असे दिसून येते

**समारोप** : प्राचीन काळापासून आजपर्यंत स्त्रियांच्या दर्जात चढ उतार आले. पूर्ववेदिक काळात स्त्रीयांचा दर्जा श्रेष्ठ होता परंतु उत्तरवैदिक काळात तो टिकून राहिला नाही मध्य युगातही स्त्रियांना दुय्यम स्थान होते, तर आधुनिक काळात स्त्रियांना काही प्रमाणात अधिकार मिळाले. परंतु स्त्रियांच्या समस्येत बदल झाला नाही. म्हणून आजही पुरूषांपेक्षा स्त्रियांचा सामाजिक दर्जा निम्न आहे असे दिसून येते.

***संदर्भग्रंथ :***

1. *गोटे, शुभांगी (2004), महिला सबलीकरण : स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन्स औरंगाबाद, पृ.क्र. 49.*
2. *www.theculturetrip.>asia>india*
3. *केदारे गौराज (2005), जातियतेचा ज्वालामुखी, वसंत बुक स्टॉल, दादर, मुंबई, प्र. आ. 2005, प.क्र. 22*
4. *देशमुख शारदा (1973), शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, पृ. क्र. 52*
5. *गोसावी मंजु ा (2008), समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प .क्र. 11.*